डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद सलग्नित

धारेश्वर शिक्षण संस्था औरंगाबाद संचलित

# कला व विज्ञान महाविद्यालय चिंचोली (लि.)

## ता. कन्नड जि. औरंगाबाद.

## (नॅक मुल्यांकन ‘ब’ दर्जा प्राप्त)

## राष्ट्रीय सेवा योजना विभाग




# नियमित कार्यक्रम अहवाल

## कार्यक्रमाधिकारी

**डॉ.गजानन चिट्टेवाड**      **प्रा. प्रतिभा आघार्डे**

# 2020-21

**प्रति,**
**मा.संचालक**
**राष्ट्रीय सेवा योजना विभाग,**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद**

**विषय : राष्ट्रीय सेवा योजनेच्या नियमित कार्यक्रमाचा अहवाल स्विकारण्या बाबत.**
**संदर्भ : NSS/2020-21/17196 दिनांक 27/04/2021.**

**महोदय,**

उपरोक्त संदर्भीय विषायास अनुसरुन सादर करण्यात येते की, आमच्या महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागा अंतर्गत नियमीत कार्यक्रम जुन-२०२० ते मार्च -२०२१ दरम्यान घेण्यात आले. या नियमीत कार्यकमाचा कृती अहवाल आपणास सादर करण्यात येत आहे.

तरी मे. साहेबांनी अहवाल स्विकारावा हि. नंम्र विनंती.

**प्राचार्य**

**सोबत :**

**१) टंकलिखीत अहवाल**

**२) प्रत्यक्ष कार्य करतांनाचे कृतीयुक्त फोटो**

**३) वृत्तपत्रातील बातम्या.**

**धारेश्वर शिक्षण संस्था औरंगाबाद संचलित;**

# कला व विज्ञान महाविद्यालय, चिंचोली (लि.) ता. कन्नड जि. औरंगाबाद

**राष्ट्रीय सेवा योजनेचा नियमित कार्यक्रम अहवाल सन २०२०-२१.**

राष्ट्रीय सेवा योजना म्हणजे विद्यार्थ्यांची जडणघडण घडवून त्यांच्या व्यक्तिमत्वाच्या विकासासोबत स्वंयसेवकांना एक जबाबदार, सक्षम, श्रजनशील, श्रमसंस्कारी नागरिक निर्माण करण्याची चळवळ आहे. राष्ट्रीय सेवा योजना सामाजिक बांधीलकीची योजना असून यामध्ये राष्ट्रीय एकात्मता, राष्ट्रनिष्ठा, राष्ट्रभक्ती, पर्यावरण, अंधश्रध्दा निर्मूलन, दहशतवादाचे उच्चाटन, जगावर आलेल्या नैसर्गीक व मानव निर्मीत संकटाच्या काळात सहकार्य, त्याविषयी जागरुकता निर्माण करणे, त्याशिवाय शासन आणि प्रशासनाला अश्या कार्यक्रमात सहकार्य करणे. आदी अनेक राष्ट्रीय प्रश्नांना सोबत घेवून चालणारी राष्ट्रीय युवक आंदोलनाची चळवळ आहे. युवक-युवतींच्या सृजनशिलतेला चालना देऊन त्यांच्या विधायक कार्यातून समाज परिर्वनाकरीता कार्यान्वित करण्याच्या उद्देशाने या महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेत विविध उपक्रम राबविले जातात. जसे सामाजिक ऐक्य पंधरवाडा, स्वास्थ्यासाठी योगा दिन, पर्यावरणाच्या संवर्धनासाठी वृक्षारोपन, स्वंयसेवकांच्या बौध्दीक विकास करण्यासाठी अनेक विविध स्पर्धा रा.से.योच्या माध्यमातून घेतल्या जातात उदा. निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, प्रश्नमंजूषा, ग्रामस्वच्छता अभियान, संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान, पर्यावरण संरक्षण राष्ट्रप्रेम आदी शिक्षणाबरोबरच समाज सेवा आणि अशा विविध गुणांचे संस्कार रा.से. योच्या माध्यमातून राबविले जातात.

कला व विज्ञान महाविद्यालय चिंलोली (लि.) ता. कन्नड येथे नियमित कार्यक्रमासाठी २०० विद्यार्थांची मान्यता आहे. तर विशेष शिबीरासाठी १०० विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठाने मान्यता दिलेली आहे. **आमचे महाविद्यालय हे ग्रामीण भागात असून पहिल्या लॉकडाऊनच्या काळात ग्रामीण भागात विशेषता औरंगाबाद जिल्हयातील चिंचोली लिंबाजी परिसरात कोरोनाचा प्रसार अत्यअल्प होता. त्यामूळे आम्ही रा.से.यो च्या माध्यमातून यावर्षी COVID-19 कोरोना माहामारीच्या काळात** विद्यार्थाचे प्रवेश घेणे चालू असतांना **आम्ही सुरक्षेची काळजी घेवून व**

**शासनाच्या नियमाचे पालन करुन** विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व गुण विकसित करण्यासाठी महाविद्यालयात नियमित कार्यक्रमांचा भाग म्हणून **काही ऑनलाईन पध्दतीने व काही ऑफलाईन पध्दतीने** विविध कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. यामध्ये प्रामूख्याने कोरोना विषयी जनतेने काळजी कशी द्यावी, शासन नियमावली त्रिसूत्री कार्यक्रमा विषयी प्रसार, मास्क वापर, हात धूने, अंतर राखने, आवश्यक कार्या शिवाय बाहेर न पडने, याविषयी आम्ही लॉकडाऊन First-१ च्या काळात ग्रामीण भागात जागरुकता वाढवण्यावर भर दिला आहे. त्याच बरोबरच कोरोना लाटेच्या दुस-या टप्यात आम्ही कोरोना लस घेण्याविषयी जनतेमध्ये जागृती करण्याकडे जास्तीत जास्त लक्ष देवून लस घेण्याविषयी ग्रामिण भागातील, परिसरातील नागरिकांची लस घेण्याची संख्या वाढवण्यावर भद दिला आहे. घरोघरी भेटी देसून महत्व पटवून देण्यात आले. त्याशिवाय **ऑनलाईन पध्दतीने स्वंयसेवकानां परीसरात कोरोना काळातील जागृती या व या सारख्या** अनेक उपक्रमांमधून युवकांचे नेतृत्व विकसित केले गेले. यामूळे विद्यार्थामध्ये न्युंनगंडाची जागा त्यांच्यामधील आत्मविश्वासने घेतली. यासारख्ये प्रयत्न आमच्या सर्वांसाठी आशादायक होते. कारण आम्ही विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास आणि सामाजिक सेवा, महामारीच्या काळातील शासन व प्रशासनाला सहकार्य करणे आदी केंद्रस्थानी ठेवून कार्य केलेले आहे करत आहोत.

सबब आमच्या महाविद्यलयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागा अतंर्गत नियमित कार्यक्रमाचा थोडक्यात अहवाल पुढील प्रमाणे आहे. मा. संचालकानी त्याचे अवलोकन करावे. हि. विनंती.

१. **२१ जुन २०२० आंतरराष्ट्रीय योगा दिन :-** यावर्षी कोरोना महामारीमूळे आणि सदर काळात महाविद्यालय बंद असल्याने **Online Yoga @ Home या नुसार** आंतरराष्ट्रीय योग दिना निर्मीताने राष्ट्रीय सेवा योजनेच्या सर्व स्वंयसेवक विद्यार्थी, विद्यार्थीनी व महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचारी यांना योगाचे प्रशिक्षण ऑनलाईन च्या माध्यमातून प्रत्येक्षिक दाखवून महत्व सांगण्यात आले. पहिल्या सत्रात प्रा. सुनिल काळे आणि डॉ. उमाकांत गायकवाड यांनी योगासनाची प्रात्याक्षिके दाखवली व दुपारच्या सत्रात योगाचे महत्व यावर भाष्य करण्यात आले आहे.

**२. वृक्षारोपण :-** माहे जूलै मध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभागा अंतर्गत महाविद्यालयाच्या परिसरात वृक्षारोपन करण्यात आले. हे वृक्षारोपन आम्ही सुरक्षेची काळजी घेवून व शासनाच्या नियमाचे पालन करुन महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. विक्रमसिंह पवार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी महाविद्यालयातील स्टाफ व रा.से.यो काही स्वंयसेवक उपस्थितीत होते.

**३. लोकशाहीर आण्णा भाऊ साठे व लोकमान्य ठिळक जयंती व पुण्यतिथी :-** आमच्या महाविद्यालयात दिनांक ०१/०८/२०२० रोजी रा.से.यो. विभागाअंतर्गत लोकशाहीर आण्णा भाऊ साठे जंयती व लोकमान्य ठिळक पुण्यतिथी साजरी करण्यात आली. यावेळी डॉ. संजय मगर अर्थशास्त्र विभाग प्रमूख आणि ग्रंथपाल डॉ. योगेश भाले यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन प्रा. वंदना पाटील यांनी केले तर आभार कार्यक्रमाधिकारी प्रा. प्रतिभा आघार्डे यांनी मानले. या प्रसंगी महाविद्यालयातील स्टाफ आणि स्वंयसेवक मोठया संख्येने उपस्थितीत होते.

**४. स्वच्छता पंधरवाडा :-** दिनांक १२/०८/२०२० रोजी रा.से.योजने चे विद्यार्थी एकत्र येवून महाविद्यालयातील परिसराची स्वच्छता केली. तसेच आपला देश आणि आपला परिसर स्वच्छ करण्याच्या अभियात म्हणजेच स्वच्छ भारत अभियानात जनतेचा सहभाग वाढवण्याचा मानस व्यक्त करण्यात आला.

**५. स्वांतत्र्य दिन ध्वजारोहन :-** १५ ऑगस्ट २०२० स्वातंत्र्य दिन कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी टी.पी. पाटील साहेब यांच्या हस्ते ध्वजारोहन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य विक्रमसिंह पवार हे होते. याप्रंसगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

**६. मतदान जागृती कार्यक्रम :** मतदार राजा जागृत हो। हा कार्यक्रम आम्ही सामाजिक अंतरपाळून व शासन नियमावलीचे पालन करुन ऑफलाईन पध्दतीने केला व या प्रसंगी मतदान नि:पक्षपणे आणि कुठल्याली अमिषाला बळी न पडता मतदान करण्याची शपथ घेतली व याविषयी स्वंयसेवकांनी नागरिकामध्ये जागृती वाढवावी असे ठरले. सदर कार्यक्रमाच्या वेळी मोठया संख्येने रासेयो स्वंयसेवक व महाविद्यालयातील स्टाफ उपस्थित होता.

**७. विद्यापीठ वर्धापन दिन :-** दिनांक २३/०८/२०२० रोजी विद्यापीठ वर्धापन दिनानिमित्त रा.से.यो चे विद्यार्थीनी एकत्र येवून महाविद्यालयातील परिसर स्वच्छता केली. प्राचार्य विक्रमसिंह पवार यांच्या हस्ते विद्यापीठाच्या ध्वजाचे ध्वजारोहन करण्यात आहे. या प्रसंगी महाविद्यालयातील कर्मचारी उपस्थितीत होते.

**८. शिक्षक दिन :-** दिनांक ०५ सप्टेबंर २०२० रोजी महाविद्यालयात रा.से.यो. विभागा अंतर्गत शिक्षक दिन साजरा करण्यात आला. या प्रसंगी मार्गदर्शक म्हणून मानसशास्त्र विभागाचे प्रा. रामेश्वर राऊत यांनी स्वंयसेवकांना मार्गदर्शन केले. ज्या देशाची शिक्षण व्यवस्था योग्य पध्दतीने कार्य करते त्या देशाचा युवा सक्षम असतो शिवाय त्या देशाच्या प्रगतीला गती मिळते असे प्रतिपादन प्रा. राऊत यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. विक्रमसिंह पवार होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. अनिता खंडागळे यांनी मानले तर अभार रा.से.यो. कार्यक्रमाधिकारी डॉ. गजानन चिट्टेवाड यांनी मानले. या प्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

**९. राष्ट्रीय सेवा योजना वर्धापन दिन:-** दिनांक २४ सप्टेंबर २०२० रोजी रा.से.योजना विभाग व्दारे राष्ट्रीय सेवा योजना वर्धापन दिनानिमीत्ताने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी कोरोना महामारी मूळे इतर कार्यक्रमाचे आयोजन न करता महाविद्यालयातच स्वंयसेवकांना **मास्क व सानीटायझर** वाटप करण्यात आले आणि त्यांना ज्या नागरीकांना मास्क व सानीटायझर घेणे शक्य नाही अशा व्यक्तीना तुम्ही मदत करा अथवा गरजू नागरीकाना सहकार्य करा अशी शिकवण देण्यात आली. कार्यक्रमाचे प्रस्तावीक कार्यक्रमाधिकारी डॉ. गजानन चिट्टेवाड यांनी केले तर सुत्रसंचालन प्रा. प्रतिभा आघार्डे यांनी केले तर आभार डॉ.वंदना बनकर यांनी मानले. सदर कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सहकार्य केले त्याच प्रमाणे स्वंयसेवक उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

**१०. महात्मा गांधी जयंती :-** राष्ट्रीय सेवा योजना विभागा तर्फे दिनांक ०२ ऑक्टोबर २०२० रोजी महात्मा गांधी यांची १५० वी जयती साजरी करण्यात आली. याप्रसंगी मार्गदर्शक म्हणून डॉ. संजय मगर हे होते.डॉ. मगर यांनी महात्मा गांधीचे जीवन चरित्र आणि कार्य यावर प्रकाश टाकला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. विक्रमसिंह पवार होते. कार्यक्रमाचे प्रस्ताविक रा.से.यो. कार्यक्रमाधिकारी डॉ. गजानन चिट्टेवाड यांनी केले तर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. वंदना बनकर यांनी केले तर अभार प्रा. प्रतिभा आघार्डे यांनी मांनले. याशिवाय महात्मा गांधीजीची ही १५० वी जंयती असल्याने रा.से.यो विभागाच्या

अनेक उपक्रम राबवण्यात आले. त्यामध्ये महात्मा गांधीजीच्या जीवन व कार्यावर निंबध स्पर्धा घेण्यात आली. तसेच महाविद्यालयाचा परिसर स्वच्छता करण्यात आली. त्याच बरोबर रक्त तपासणी शिबीर ग्रामपचायत कार्यालय चिंचोली व प्रथामिक आरोग्य केंद्र चिंचोली लिंबाजी आणि रा.से.यो विभागाच्या संयुक्त विद्यामाने, वयोवृध्द महिला आणि रासेयो स्वंयसेवकांची रक्त तपासणी करण्यात आली. सदर उपक्रमासाठी रा.से.यो.चे स्वंयसेवक उपस्थित होते.

**११. संविधान गौरव दिन व संविधान सप्ताह निमित्त कार्यक्रम :-** दिनांक २६/११/२०२० रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे महाविद्यालयात संविधान गैरव दिन ऑनलाईन पध्दतीने साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यलयाचे प्राचार्य डॉ. विक्रमसिंह पवार होते. या प्रसंगी परभणी येथील ॲड अमोल गिराम आणि डॉ विनोद खैरे हे प्रमूख मार्गदर्शक म्हणून उपस्थीत होते. प्रतिमेचे पुजन करुन भारतीय संविधावर भाष्य करण्यात आले. तसेच संविधानाच उद्देश पत्रिकेचे सामूहिक वाचन करण्यात केले गेले. कार्यक्रमाचे प्रस्तावीक व सुत्रसंचालन प्रा. राजेश काबळे यांनी केले तर आभार रा.से.यो.कार्यक्रमाधिकारी डॉ.गजानन -चिट्टेवाड यांनी मानले. या प्रसंगी महाविद्यालयातील सर्व स्टाफ आणि रा.से.यो.स्वंयसेवक उपस्थित होते. त्या शिवाय संविधान सप्ताह निमित्ताने रा.से.यो. विभाग व लोकप्रशासन विभाग यांच्या संयुक्त विद्यामाने दिनांक ११-१०-२०२० रोजी व्याख्यानाचे आयोजन करुन सदर कार्यक्रमासाठी मार्गदशक म्हणून परभणी येथील ॲड अमोल गिराम यांना आमत्रीत करण्यात आले.

**१२. संत गाडगेबाबा पुण्यतिथी :-** राष्ट्रीय सेवा योजना विभागा तर्फे संत गाडगेबाबा पुण्यतिथी साजरी करण्यात आली याप्रसंगी मार्गदर्शक डॉ. यंशवत गाडे यांनी गाडगेबाबा यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विक्रमसिंह पवार होते. कार्यक्रमाचे संचालन डॉ. पुरुषोत्तम मनगटे यांनी केले तर अभार डॉ. उमांकात गायकवाड यांनी मानले.

**१३.सावित्रीबाई फुले जयंती :-** दिनांक ०३ जानेवारी २०२१ रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागा तर्फे क्रांती ज्यांती सावित्रीबाई फुले यांची जंयती साजरी करण्यात आली. या प्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. विक्रमसिंह पवार होते. तर मार्गदर्शक म्हणून प्रा. प्रतिभा आघार्डे यांनी सावित्रीबाई फुले यांच्या समग्र कार्यावर सखोल असे मार्गदर्शन केले. संचालन डॉ. अनिता खंडागळे यांनी केले तर अभार प्रा. वंदना पाटील यांनी मानले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचारी तसेच रा.से. यो. स्वंयसेवक उपस्थितीत होते.

**१४. नेजाजी सुभाष चंद्र भोस यांची १२५ वी जंयती पराक्रम दिन :-**

**दिनांक २३ जानेवारी २०२१** रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे नेजाजी सुभाष चंद्र भोस यांची १२५ वी जंयती पराक्रम दिवस म्हणून ऑनलाईन पध्दतीने साजरी करण्यात आली. या प्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. विक्रमसिंह पवार होते. तर मार्गदर्शक म्हणून डॉ. पुरुषोत्तम मनगटे आणि प्रा. राजेश कांबळे होते. यांनी भोस यांच्या समग्र कार्यावर सखोल असे मार्गदर्शन केले. संचालन डॉ. गजानन चिट्टेवाड यांनी केले तर अभार प्रा. प्रतिभा आघार्डे यांनी मानले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचारी तसेच रा.से.यो. स्वंयसेवक उपस्थितीत होते.

**१५. आंतरराष्ट्रीय महिला दिन :-**

**दिनांक ८ मार्च ०२१** रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे **आंतरराष्ट्रीय महिला दिन** साजरा करण्यात आला. या प्रसंगी कोरोना महामारीमूळे मोठया स्वरुपातील कार्यक्रमाचे आयोजन न करता एक प्रमूख पाहूना व मार्गदर्शक यांच्या हस्ते कर्त्या महिलांचा सन्मान म्हणून महाविद्यालयचे प्राचार्य डॉ. विक्रमसिंह पवार तसेच प्रमूख पाहूने मोरगे सर यांच्या हस्ते चिंचोली परिसरातील कर्त्या महिला, शिक्षीका यांना महिला सन्मान प्रमाणपत्र देण्यात आले. याप्रसंगी रा.से.यो कार्यक्रमाधिकारी डॉ. गजानन चिट्टेवाड व डॉ. उमाकांत गायकवाड उपस्थितीत होते.

**Yoga@Home ऑनलाईन कार्यक्रमात आंतरराष्ट्रीय योगा दिनानिमित्त योगासने करतांना परिवारासह महाविद्यालयातील सर्व कर्मचारी.**









योगा मार्गदर्शक प्रा. सनिल काळे  विभाग





महाविद्यालयाच्या परिसरात वृक्षारोपन करतांना रा.से.यो.चे स्वंयसेवक आणि महाविद्यालयातील उपस्थित स्टाफ



लोकशाहीर आण्णा भाऊ साठे जंयती व लोकमान्य ठिळक पुण्यतिथी निमित्त प्रतिमेचे पुजन करतांना सर्व प्राध्यापक व कर्मचारी वृंद



स्वच्छता पंधरवाडा निमित्त विद्यार्थांना महाविद्यालयात बोलावले असता प्रवेशा वेळी स्वंयसेवकांचे थर्मामीटरने तापमान चेकअप करुन प्रवेश देतांना डॉ. उमाकांत गायकवाड, डॉ. गजानन चिट्टेवाड आदी.






प्रत्यक्ष स्वच्छता करतांना रा.से.यो. स्वंयसेवक व डॉ.पुरुषोत्तम मनगटे डॉ. यंशवत गाढे



प्रत्यक्ष स्वच्छता करतांना रा.से.यो. स्वंयसेवक व डॉ. योगेश भाले, प्रा. प्रतिभा आघार्डे आदी






**शिक्षक दिनानिमित्त कार्यक्रमाचे सुत्रसंचालन करतांना डॉ. गजानन चिट्टेवाड या प्रसंगी व्यासपीठावर उपस्थित प्राचार्य डॉ. विक्रमसिंह पावर डॉ. अनिता खंडागळे व प्रा. रामेश्वर राऊत.**




**राष्ट्रीय सेवा योजना दिना निमीत्त महावद्यिालयात विद्यार्थ्यांना कोरोना महामारीचे महत्व सांगून यामध्ये स्वयंसेवकांनी समाज जागरुती विषयी काय भूमिका द्यावी यांची माहिती देण्यात आली. आणि त्यांना मास्क, सानीटायझर वाटप करण्यात आले.**



**रा.से.यो चा वर्धापन दिनानिमित्ताने चिंचोली लिं येथील स्वंयसेवकांना कोरोना महामारीत आपली व परीवाराची सुरक्षा कशी द्यावी याविषयी माहिती सांगतांना महाविद्यालयातील रा.से.यो. समितीचे सदस्य डॉ. उमाकांत गायवाड.**




**महाविद्यालयात रा. से. यो. दिना निमीत्त स्वंयसेवकांना मास्क व सानीटायझर वाटप करतांना रा.से.यो. समीती सदस्य.**





**संविधान संप्ताह निमित्ताने रा.से.यो. विभागाअंतर्गत भारतीय संविधान आणि समाज या विषयावर बोलण्यासाठी मार्गदर्शक म्हणून परभणी येथील प्रसिध्द व्याख्याते ॲड अमोल गिराम व आकोला येथील डॉ. विनोद खैरे प्रमूख मार्गदर्शक म्हणून ऑनलाईन उपस्थित राहून मार्गदर्शन केले.**



† संविधान दिना निमित्ताने रा.से.यो. विभागाअंतर्गत भारतीय संविधान आणि समाज या विषयावर स्वंयसेवकांना मार्गदर्शन करतांना ॲड अमोल गिराम सर



महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पुजन करतांना महाविद्यालयातील सर्व स्टाफ



महात्मा गांधी यांची १५० वी संर्वण जंयती असल्या कारणाने ग्रामपंचायत कार्यालय, प्राथमिक आरोग्य केंद्र चिंचोली लिबाजी आणि रासेयो विभागामार्फत स्वंयसेवक विद्यार्थासाठी व वयोवृध्द महिलाकरीता रक्त तपासणी शिबीर संयुक्त विद्यामाने राबवण्यात आले.




विद्यार्थांची व वयोवृध्द महिलांची रक्त तापासणी करतांना प्राथमिक आरांग्य केंद्रातील अधिकारी, कर्मचारी व उपस्थिती स्वंयसेवक



महात्मा गांधी यांची १५० वी संर्वण जंयती निमित्ताने महाविद्यालयात महात्मां गांधी यांच्या जीवन कार्यावर निंबध स्पर्धा आयोजीत करण्यात आली या प्रसंगी रा.से. यो. कार्यक्रमाधिकारी डॉ. गजानन चिट्टेवाड व विद्यार्थी



महात्मा गांधी जंयती निमित्त स्वच्छतेविषये चिंचोली लि. येथे स्वच्छतेविषये महत्व सांगितले व महाविद्यालयाच्या परिसरात प्रत्येक्ष स्वच्छता केली त्या प्रसंगी डॉ. अनिता खंडागळे प्रा. प्रतिभा आघार्डे रा.से.यो कार्यक्रमाधिकारी डॉ. गजानन चिट्टेवाड व उपस्थितीत स्वंयसेवक





प्रत्येक्ष महाविद्यालयाच्या परिसरात स्वच्छता करतांना रा.से.यो. स्वंयसेवक व डॉ. गजानन चिट्टेवाड डॉ. पुरुषोत्तम मनगटे व सुनिल काळे. आदी.





महाविद्यालयातील रासेयो स्वंयसेवक वरीष्ठ नागरीकांना व दिव्यांग जनतेला मदत कार्य करतांना श्री उमेश संनान्से व शेख वसीम आदी.







महाविद्यालयातील रासेयो स्वंयसेवक बुथवरील वरीष्ठ नागरीकांना व दिव्यांग जनतेला मदत कार्य करतांना






दिनांक २३ जानेवारी २०२१ रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे नेजाजी सुभाष चंद्र भोस यांची १२५ वी जयंती पराक्रम दिवस म्हणून ऑनलाईन पध्दतीने साजरी करण्यात आली. या प्रसंगी प्रा. राजेश कांबळे राज्यशास्त्र विभाग प्रमख व डॉ. पुरुषोत्तम मनगटे समाजशास्त्र विभाग प्रमूख यांनी मार्गदर्शन केले.




झूम ऑपवर ऑनलाईन मार्गदर्शन करतांना डॉ. पुरुषोत्तम मनगटे समाजशास्त्र विभाग प्रमूख.









**क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जंयती निमित्त कार्यक्रमाचे सुत्रसंचालन करतांना डॉ. अनिता खडागळे मॅडम सदर कार्यक्रमात मार्गदर्शक म्हणून प्रा. प्रतिभा आघार्डे यांनी विचारमांडले याप्रसंगी मंचावर उपस्थित प्राचार्य डॉ. विक्रंमसिंह पवार प्रा. प्रतिभा आघार्डे प्रा. वंदना पाटील आदी.**




**क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जंयती निमित्त कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करतांना प्राचार्य डॉ. विक्रंमसिंह पवार**

राष्ट्रसंत गाडगेबाबा जंयती निमित्त कार्यक्रमाचे सुत्रसंचालन करतांना प्रा. प्रतिभा आघार्डे व उपस्थित मान्यवर



राष्ट्रसंत गाडगेबाबा जंयती निमित्ताने यांच्या जीवन कार्यावार प्रकाश टाकतांना व्यासपीठावर उपस्थित प्राचार्य डॉ. विक्रमसिंह पवार रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. गजानन चिट्टेवाड आदी.



राष्ट्रसंत गाडगे बाबा जंयती निमित्ताने प्रतिमा पुजन करून सामूहीक फोटो या प्रसंगी उपसस्थित स्वंयसेवक व स्फाफ.

**दिनांक ८ मार्च ०२१ रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा करण्यात आला. या प्रसंगी कोरोना महामारीमूळे मोठया स्वरुपातील कार्यक्रमाचे आयोजन न करता प्रमूख पाहूने व मार्गदर्शक यांच्या हस्ते कर्त्या महिलांचा सन्मान म्हणून महाविद्यालयचे प्राचार्य डॉ. विक्रमसिंह पवार तसेच प्रमूख पाहूणे श्री मोरगे सर यांच्या हस्ते चिंचोली परिसरातील कर्त्या महिला, शिक्षीका यांना महिला सन्मान प्रमाणपत्र देण्यात आले. याप्रसंगी रा.से.यो कार्यक्रमाधिकारी डॉ. गजानन चिट्टेवाड व डॉ. उमाकांत गायकवाड उपस्थितीत होते.**



**आंतरराष्ट्रीय महिला निमीत्ताने प्रमूख पाहूणे श्री मोरगे सर आणि प्राचार्य डॉ. विक्रमसिंह पवार यांच्या हस्ते चिंचोली परिसरातील कर्त्या महिला, प्राध्यापीका व शिक्षीका यांना महिला सन्मान प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले.**




दिनांक ८ मार्च ०२१ रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे आंतरराष्ट्रीय महिला दिना निमीत्त चिंचोली लिंबाजी परिसरातील कर्त्या महिला, शिक्षीका व प्राध्यापीका यांना महिला सन्मान प्रमाणपत्र वितरीत केल्यानंतरचा सामूहीक फोटो.



रासेयो स्वंयसेवकांना मतदार जागृती विषयी मार्गदर्शन करतांना कार्यक्रमाधिकारी डॉ. गजानन चिट्टेवाड



मतदान निःपक्षपणे, कुढल्याही अमीषाला बळी न पडता मतदान करण्याची शपथ घेतांना रासेयो स्वंयसेवक आणि उपस्थित महाविद्यालयातील संपूर्ण स्टाफ.






मागील एक आठवण कोरोना महामारीमूळे असे अनेक बंधारे यावषी राहून गेल्याची खंत वाटते. दिनांक ११/०२/२०१९ रोजी रा.से.यो. विशेष शिबीर समारोप समांरभाच्या वेळी श्रमदानातून निर्माण केलेला माती बंधा-याची पाहणी करतांना मौजे नेवपूर येथील ग्रामस्थ, प्राध्यापक व स्वंयसेवक, स्वंयसेविका.



मागील एक आठवण कोरोना महामारीमूळे असे अनेक बंधारे यावर्षी राहून गेल्याची खंत.



***End NSS Regular Camp Report-2020-21***